# सेझार व्हाय्येहो

## दिलीप पुरुषोत्तम चित्रे

# दहा बाय दहा





म. ग्रं. सं. ठाणें
[विष]य काव्य
[क्र]. २५०२

REFBK-0024146
REFBK-0024146

अनु
प्रास
माला

द हा
वा य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०२
२०७२६
काव्य ३।३।८
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024146
REFBK-0024146

आधींचे अनुप्रास ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

उस्ताद अल्लाउद्दीनखाँ ☐ माझी कहाणी

गौरकिशोर घोष ☐ इसम

बार्बियानाची शाळा ☐ प्रिय बाई,

पूषन् गुप्त ☐ त्यांचा भारत

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचीं आणखी पुस्तकं ☐ ☐ ☐ ☐ ☐

कविता (मौज, १९६०)

An Anthology of Matathi Poetry (निर्मला सदानंद, १९६७)

ऑर्फियस (मौज, १९६८)


शिबा राणीच्या शोधांत (मॅजेस्टिक, १९६९)


Ambulance Ride (स्वत:, १९७२)

कवितेनंतरच्या कविता (वाचा, १९७८)

Travelling in a Cage (क्लिअरिंग हाऊस, १९८०)

चाव्या (प्रास, १९८२)




मास

प्रास २० वा □ □ □ □ □ □ □ □ □ □
दहा बाय दहा

© दिलीप पुरुषोत्तम चित्रे
© मूळ स्पॅनिश कविता □ जिओर्जेट व्हाय्येहो

पहिली खेप □ नाताळ १९८३

मुखपृष्ठ □ पाब्लो पिकास्सो □ बाळ ठाकूर
मांडणी □ अशोक शहाणे


मुद्रक □ सुरेश जगताप □ जनसेवा मुद्रणालय □
१९२ शुक्रवार □ पुणें ४११ ००२

प्रकाशक □ अशोक शहाणे □ प्रास प्रकाशन □
३९ नाथमाधव □ कांदिवली पूर्व □ मुंबई ४०० १०१

किंमत □ बारा रुपये

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

सेझार व्हाय्येहोची बायको
जिओर्जेट व्हाय्येहो
हिला


द हा

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

एक माणूस खांद्यावर पावाची लादी घेऊन जातो समोरून.
तर आतां काय त्याच्याबद्दल लिहूं मी त्यानंतर, माझ्या तोतया ?

आणखी एकजण स्वतःचं खंग खाजवतो, कांखेंतून एक ऊ काढून चिरडतो.
मनोविश्लेषणाबाबत बोलण्यांत आतां काय हंशील आहे ?

आणखी एकानं तर माझ्या छाताडावर सोटा हाणलाय.
तर मग मीं आतां डॉक्टरांशीं काय सॉक्रेटिसवर चर्चा करूं ?

एक लंगडा आपला दंड देतो एका लहान पोराला धरायला.
ह्यानंतर आतां मी आँद्रे ब्रेताँ वाचणाराय काय ?

एकजण थंडींत कुडकुडतो, खोकतो, रक्त थुंकतो.
मी माझ्या अंतरात्म्याचा निर्देश करणं कधीं प्रशस्त ठरेल काय ?

आणखी एकजण उकिरडा चिवडत शोधतो टरफलं नि हाडकं.
तर मीं आतां अनंतकाळाविषयीं लिहिणं कसं शक्य आहे ?

एक गवंडी न्याहारीपूर्वींच छपरावरून पडून मरतो.
तर मग मी आतां कसली नवी लय किंवा रूपकं सुरूं करूं ?

एक वाणी गिऱ्हाइकाला एक ग्रॅम वजनाला फसवतो.
मग यापुढं मी चवथ्या परिमाणाविषयीं काय बोलणार ?

एक बँकर जमाखर्चांत अफरातफर करतो.
आतां रंगभूमीसाठीं ढाळायला अश्रू कुठें उरलेत ?

एक पांगळा स्वत:चा पाय खांद्यावर घेऊन झोंपतो.
आतां सगळं सोडून मीं पिकास्सोविषयीं बोलावं का काय ?

कोणीतरी थडग्याजवळ बसून हुंदके देतंय.
आतां मी अकादेमीचा सभासद व्हायचा विचार करूं ?

एक इसम स्वैंपाकघरांत बसून बंदूक साफ करतोय.
पण त्याबद्दल अधिक कांहीं बोलून काय फायदा ?

कोणतरी आपल्याच हाताचीं बोटं मोजत चाललाय.
आतां मी आत्महीनतेविषयीं बोलतांना बोंबलणार नाहीं तर काय ?

आज रात्रीं पाऊस पडला तर मी इथून
हजार वर्षं खोल निघून जाईन,
बरं, फक्त शंभरच, जास्त नको.
जणू कांहींच झालं नाहीं असं समजून
मी अशी कल्पना करीन कीं अजून मी जन्मायचोंय.

किंवा बिनआईचा, बिनप्रेयसीचा, बिनहट्टाचा
जमिनीवर बसून वाट पहाणारा, एकाच
उद्देशानं,
आज रात्रीसारखा, मी पिंजारत असीन
वैदिक कापूस,
माझ्या शेवटाचं वैदिक सूत, धागा
सैतानाचा, एकाच घंटेंत
काळाचे दोन-दोन बेसूर तालवादक
नाक धरून पकडायचा प्रयत्न करत.

मी माझं आयुष्य कल्पून चाललों काय
किंवा धरून चाललों कीं अजून मी जन्मायचोंय,
मी माझी सुटका करूंच शकणार नाहीं.

जें अजून घडलं नाहीं तें नव्हे, तर
जें येऊन अगोदरच गेलंय,
पण जें येऊन अगोदरच गेलंय.

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५०२
२७१२६
काव्य ३।३।८२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

अहा ! ह्या चार सफेद भिंती.
इलाज नाहीं, कायम चारच्या चारच.

कांचेच्या घरांत मज्जेच्या वनस्पती, दुखरं भोक :
चारी कोपऱ्यांत त्या कायम उन्मळून पडलेल्या असतात.
हातापायांना जखडलेले असतात दररोजचे साखळदंड.

मायाळू बाई ग, असंख्य चाव्यांचा जुडगा सांभाळणारी तूं
जर इकडे असतीस, जर तूं नुस्तं पाहूं शकत असतीस
कसे हे तास न् कलाकच ह्या चार भिंती झालेत.
खरं तर आपण जोडीनं टेकायला हवं त्यांच्यावर दोघांनीं मिळून
आपण दोघांनींच कधीं नव्हे इतकं. आणि तूं रडायचं नाहींस,
शप्पथ, माझ्या उद्धारकर्ती !

अहा ! ह्या कोठडीच्या चार भिंती.
तरी पण मला दया येतेय भिंतींची, आज तर जास्तच,
त्या दोन लांब भिंती ज्यांनीं धरलाय
एक आयांचा आकार ज्यांच्या कडेवरून जातायत
प्रेतं उतरलीं फोटोच्या उतारांवरून
प्रत्येकीनं धरलाय एकेक लहान मुलाचा हात घट्ट.

आणि मी एकटाच एका कडेला सरकून
माझा उजवा हात उंचावतों माझ्या दोन्ही हातांऐवजीं उरलेला
तिसरा बाहु शोधतोंय मी कवेंत घेण्यासाठीं
आणि घर करून द्यायला माणसाच्या रोगट बहुसंख्येला
माझ्या कुठें आणि केव्हांच्या मधोमध.

मी मोकळा होतों समुद्राच्या जोखमींतून
जेव्हां लाटाच माझ्याशीं येऊन भिडतात.

आम्ही सर्वत्र मीठ छिडकणारे. अप्रतिम गाण्यांत, भाग्यवंत गाण्यांत
इच्छेच्या अधरोष्ठावर मिसळून चवदार.
केवढं सुंदर कौमार्य.
बघ निघून जातेय अळणी झुळूक.

लांबवरून मी श्वासांत भरून घेतोंय रक्ताचा अर्क
ऐकतोंय मी गहिरी सरगम आणि बंदिश
जशा भरतीच्या लाटा शोधतायत श्रुती.

आणि ह्या तर्कशून्यतेंत जर आम्ही
असलं कांहीं म्हणालों आमच्या नाकपुड्यांबद्दल
तर आमची गरीबी मढवली जाईल सोन्यानं
आणि उगवून येईल रात्रीला अजून न जन्मलेला पंख
दिवसाच्या बेवारशी पंखाला लाभेल जोडीदार
जो एकच असल्यामुळें पंखच नाहीं, खरं तर.

आतां एक असा अजस्र कोळी आहे इथं, जो सरपटूं शकत नाहीं;
एक रंगहीन कोळी ज्याचं शरीर म्हणजे
आहे नुस्तं एक डोकं आणि एक पोट, भळभळा रक्ताळणारं.

आज मीं त्याला अगदीं जवळून पाहृचला. आणि किती जोरजोरानं
सगळ्या बाजूंना
पसरले होते त्यानं आपले अगणित पाय.
आणि माझ्या मनांत आला त्याच्या अदृश्य डोळ्यांचा विचार
जे असतील कोळ्याचे मरणांतिक वाटाडे दैवी.

तो कोळी आहे थरथरत अडकून
एका दगडाच्या कडेला
त्याचं पोट एका बाजूला
आणि दुसऱ्या बाजूला डोकं.

विचाऱ्यापाशीं आहेत एवढे ढीगभर पाय आणि तरीहि
त्याला ठरवतां येत नाहीं कांहींहि. आणि असल्या निर्वाणीच्या स्थितींत
त्याला स्तंभित झालेला पाहून,
आज मला इतकी काळजी वाटतेय त्या प्रवाशाची.

आतां एक अजस्र कोळी आहे इथं ज्याचं पोट
त्याला जाऊं देत नाहीं आपल्या डोक्यापाठोपाठ.
आणि माझ्या मनांत आले त्याचे डोळे
आणि त्याचे अगणित पाय.
आणि आतां मला केवढी काळजी वाटतेय त्या प्रवाशाची !

संताप--ज्यानं मुलं-मुलं होऊन जातो माणूस तुटून
ज्यानं मुलाचे मोडून नेमके दोन बरोबर पक्षी होतात
आणि नंतर पक्ष्याचे भाग होतात दोन छोटीं अंडीं;
गरीब माणसाचा संताप म्हणजे काय
तर दोन व्हिनेगरांविरुद्ध असलेलं तेल.

संताप--ज्यानं झाडाचीं पानं पानं होऊन फुटतात
ज्यानं पान भागलं जातं असमान कळ्यांत
आणि कळी विभागली जाते दुर्बिणीच्या नळकांड्यांप्रमाणें;
गरीब माणसाचा संताप म्हणजे काय
तर अनेक समुद्रांविरुद्ध फक्त दोनच नद्या.

संताप--ज्यानं पुण्यकर्म दुभंगून त्याचे किंतु-किंतु होतात
आणि किंतूच्या होतात तीन समानशील कमानी
आणि मग कमान दुभंगून होतात अकल्पित थडगीं;
गरीब माणसाचा संताप म्हणजे काय
तर दोन चाकूंच्या विरुद्ध एकमेव पोलाद.

संताप--ज्यानं आत्मा मोडून त्याचीं शरीरं-शरीरं होतात
आणि शरीराचे भाग होतात असमान अवयवांत
आणि अवयवांच्या ऑर्गनला फुटतात विचारांचीं सप्तकं;
गरीब माणसाचा संताप म्हणजे काय
तर दोन ज्वालामुखी विवरांच्या मधोमध नेमकी आग.

जें मजबूत आहे त्यावर माझी श्रद्धाय
ठेव मला असाच अपंग, वाऱ्या, जाऊं दे मला.
मीं पेहरलींत माझीं शून्यं, माझं तोंड शून्याय.
हे स्वप्ना, दे मला तुझा वज्रासारखा हिरा
तुझं बिनवास्तवाचं भान.

जें मजबूत आहे त्यावर माझी श्रद्धाय.
एका अंतर्गोल बाईची जाणारी आकृति
रंगहीन राशीसारखी,
जिथं संपतं तिचं तगणं तिथंच सुरूं माझं जगणं.

एका धुळकट जेसुईटाच्या गांडीवर मी फटका मारतों,
राष्ट्राध्यक्षांच्या हिरव्या बॅनर्स मी खालीं उतरवतों,
मरणाचे सगळे खेकडे, सगळे शेवटचे झेंडे,
सगळीं खरजट पोस्टरं उलटीं फाडतों.

मी आहें यावर माझी श्रद्धाय,
आणि मी फालतू होतों यावर.

हे समग्रांच्या अग्रेसरा !

त्याच्या मेलेल्या कंबरेपाशीं एक पुस्तक पडलं होतं,
एक पुस्तक फांदीसारखं फुटत होतं त्याच्या मुडद्यांतून.
त्यांनीं उचलून नेला हुतात्मा,
आणि त्याच्या दुर्दैवी शारीर तोंडाचा झाला आमच्या श्वासांत शिरकाव;
आम्ही सगळे घामाघूम झालों, स्वतःची बेंबीहि आम्हांला झेपेना;
भटकणारे चंद्र करत होते आमचा पाठलाग;
आणि त्या प्रेतालाहि फुटला होता दुःखाचा घाम.

आणि एक पुस्तक, टोलेडोच्या लढाईत,
एक पुस्तक, पाठीमागें एक पुस्तक, वर एक पुस्तक,
मुडद्यांतून फांदीसारखं फुटणारं.

जांभळ्या गालफडाचं काव्य, सांगणारं
आणि न सांगणारं,
काव्य त्याच्या नैतिक संदेशाचं
त्याच्या हृदयासकटचं.
पुस्तक सोडून कांहींच उरलं नाहींय कारण नाहींत
कबरींत किडे,
आणि त्याच्या बाहीच्या टोकाला हवेचं थारोळं
वायुमय आणि अनंत होणारं.

आम्ही सगळे घामाघूम झालों, स्वतःची बेंबीहि आम्हांला झेपेना,
आणि त्या प्रेतालाहि फुटला होता दुःखाचा घाम,
आणि मीं पाहिलं हेलावून एक पुस्तक
एक पुस्तक, पाठीमागें एक पुस्तक, वर एक पुस्तक,
मुड्यांतून त्वेषानं फांदीसारखं फुटणारं.

लढाई थांबल्यावर
आणि लढणारा मरून पडल्यावर एकजण त्याच्याकडे आला
आणि म्हणाला, " मरूं नकोस, माझं तुझ्यावर प्रेम आहे ! "
पण प्रेत आपलं मरतच राहचलं.

आणखी दोघे त्याच्याकडे आले आणि म्हणाले,
" आम्हांला सोडून जाऊं नकोस ! दम धर, पुन्हां जिवंत हो ! "
पण प्रेत आपलं मरतच राहचलं.

वीसजण धांवत आले, शंभर, हजार, पांच लाख धांवून आले,
ओरडाय' लागले, " इतकं सगळं प्रेम, तरी बेकार हचा मरणापुढें ! "
पण प्रेत आपलं मरतच राहचलं.

नंतर जगांतलीं सगळीं माणसं
त्याच्याभोंवतीं जमा झालीं; त्या उदास प्रेतांत त्यांना पाहून एकच हालचाल झाली;
तो हळूहळू उठून वसला,
आणि पहिल्या माणसाला कडकडून मिठी मारून चालाय' लागला....

मी मरीन पॅरीसमधें मुसळधार
तो दिवस आहे अगोदरच माझ्या मरणांत
मी मरीन पॅरीसमधें -- त्याची नाहीं मला खंत--
कदाचित् आजच्याप्रमाणेंच गुरुवारीं ऐन पानगळींत.

गुरुवारच असेल तेव्हां, आज जसाय गुरुवार, जुळवतांना
ह्या ओळी, माझे हात जणूं नासून गेलेत
आणि कधींच ह्या वाटेवर यापूर्वी
नव्हतों मी आजच्याइतका सर्वस्वीं एकाकी.

सेझार व्वाय्येहो मरून गेलाय, सर्वांनीं हाणलेला
जरी त्यानं कुणालाहि कांहींच केलं नाहीं,
त्यांनीं ठेचलाय त्याला पुन:पुन्हां लाठ्यांनीं

झोडपलाय जाडजूड दोरखंडांनींसुद्धां; याला साक्ष
आहेत सर्व गुरुवार आणि त्याच्या हातांचीं हाडं,
एकाकीपण, मुसळधार पाऊस, आणि रस्ते ....

जबाबादाखल काय सांगूं ? कसं काय घडलं तें ?
कीं मी खरचटलोंय बंबाळलोंय,
असा कडेकडेनं चालून,
देवळांतल्या बाहुल्यांचे ते हिंस्र चेहरे पाहून.
माझ्या कपाळावर खरपुडलेलं रक्त, पारा.
त्या स्वत:च्या ढुंगणांच्या लोडावर रेललेल्या जमिनदारणी.
जें असूंच नये, तेंच होतं सतत बरोबर.
ना ताळ ना मेळ.
ठार वेडेपण.
त्रुईल्लोपासून लायमापर्यंतचा सबंध रस्ता तुडवत जाणं,
कशासाठीं, तर पैशापेक्षांहि हलक्या कमाईसाठीं.

दहा

कवि

पुरुषोत्तम

पाटील

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2502
23976
काव्य 3/3/78
शाखा (स्थळ प्रत)

दारिद्र्याच्या रोगाला
कवितेचीं लक्षणं फुटतात
असाध्य जखमांसारखीं.
पूर्वीं वाटायचं कीं सर्व संपल्यावर
एक निराकार तेजस्वी आत्मा उरतो.
आतां दिसतोय
एक अजस्र कोथळा,
आणि माणसाची
कायम भळभळणारी भूक.
अपंगपणें क्षितिजं ओलांडणारा
मातींत पडलेला पक्षी,
ज्याच्या चोचींत पुरला नसता
पृथ्वीचा भरीव दाणा...
— भर रस्त्यांत
परमेश्वर पडलाय उताणा.
त्याचं तोंड उघडं नसतं
तर हेंहि कळलं नसतं.

एका माणसाच्या भुकेचेच तुकडे तुकडे करून
सबंध जगानं वांटून खाल्ले तरी
एका माणसाचा एकेक तुकडा यापुढें
शब्द शब्द करून जगभर वांटला
तरी कोणाला कवितेचा ढेकर येणार आहे ?
एका माणसाच्या भाषेंतून
जरी सबंध समाजाचं लुळंपांगळं शरीर
आकाशांत झेपावलं
तरी त्याच्या डोळ्यांतलं पाताळ यापुढें
कोणाला दिसणार आहे ?
यापुढें कोण गाणार आहे, व्वाय्येहो ?

गुडघे खरचटल्यावर गळ्यांतलं गाणं
गळ्याभोंवतीं आवळलं.
मात्र मीं इतरांचीं दु:खं आजूबाजूलाच ठेवलीं
गणपतीभोवतीं जशी आरास.
गल्लींत लाउडस्पीकर गात होता
तेव्हां मीं कानावर हात ठेवून
आंतली शांतता सांभाळली.
नैराश्य आणि वैफल्य मीं सतत टाळलं
कारण रस्त्यावर दुतर्फा तेंच होतं
मी जो रस्ता चाललों
तो माझा मार्ग नव्हता.
मी नरकांत हिंडलों गंधर्वासारखा.
आणि तूं, व्वाय्येहो, तूं जर इथला असतास
तर ह्या इथल्या कवितेंत वाढली असती
एक अद्वितीय झोपडपट्टी —
सरस्वतीच्या नितळ त्वचेवर पसरणारी
असाध्य खरूज :
काळीज खलास करणारी
खर्जातली मींड.

आपल्यांतला फरक एवढाच :
पावाचा तुकडा बघतांच
तुझ्या नजरेसमोर उपाशी तोंडं उघडतात
तर मी भुकेच्या तुरुंगांत
पोटभर पावित्र्य शोधतों म्हणून
मला वाईनचा ग्लास आठवतो.

तुला तुझ्या मरणाचा दिवस
सतत डोळ्यांसमोर दिसतो :
आणि धर्माशिवाय, क्रांतीशिवाय
मी विटेवर उभा असतों स्थिर
माझ्या परंपरेनुसार
माझ्या परंपरेपलिकडे.

यातना तर बसूं शकतात
चवदा ओळींतसुद्धां.
सभ्य सुनीतासारख्या.

कवी सभ्यच असतात
सैरावैरा धावणाऱ्या
खुनशी भाषेच्या गदारोळांत

एखाद्याचाच चेंदामेंदा
स्मारक करण्यालायक होतो
जसा, त्वाय्येहो, तुझा.

१९५७ सालीं आपली चुकामूक झाली.
मला दोनच शर्ट होते. एक धुवावा लागे
रोज रात्रीं. पावसाळ्यांत गोची व्हायची.

सकाळीं रुइया कॉलेजांत सर्द शर्टानं
मी उपाशी जायचों. आणि तिथं केवढ्या मुली.
तारुण्यानं मुसमुसलेल्या. पण माझ्या खिशांत
जेमतेम बारा आणे दिवस काढायला.

आणि भरदिवसां रात्रपाळीचाच मी कवि
चरसाची सिगरेट पिऊन युनिव्हर्सिटींत गेलों
पोएमास ह्यूमानोस शोधायला. नव्हतं.

त्यावर्षीं पास होणं आवश्यक होतं.
धडाधडा नोट्स पाठ करायला हव्या होत्या.
पेपर फुटण्याची वाट पहायला हवी होती.

तसं न करतां मुसलमानाकडे शोर्वा-रोटी
खाऊन दादर मेन रोडवर फिरलों
लोखंडी पुलावरनं विजयनगरकडे आलों

कबूतरखान्यावरनं, रानडे रोडनं थेट
चौपाटीपर्यंत चालत गेलों. दादरच्या स्मशानांत,
व्वाय्येहो, माझेहि मित्र जळून गेलेत.
कोपऱ्यावर सोडा तयार मिळतो, गल्लींत दारू.

फाटलेल्या स्वर्गाला गळ्यांतल्या
स्वरांचीं ठिगळं लावून, तरुणपणीं
अनवाणी चालायचों मी रात्रीं
किंग्जसर्कलपासून भायखळा पुलापर्यंत

दारिद्र्याइतकी सर्वंकष कविता लिहायचं
कधींच माझ्या मनांत आलं नाहीं
कारण प्रत्येक दुःखाला व्यक्तिगत
अस्तित्वाचे कांटे होते, इतिहासानं जवळ येऊं नये म्हणून

हे कांटे, व्वाय्येहो, माणसाचा मूळ कोट
आणि कातडं, त्याची स्टाइल जिच्याखालीं
खरं अवैयक्तिक दुःख उरतं असुरक्षित
कोणीं कधीं पाहूं नये इतकं अनाधार

एखाद्याचा बाप मरतो दुकानाच्या पायरीवर
दुसऱ्याच्या मुलाला परवडत नाहीं ट्रीटमेंट
तिसऱ्याची बायको बेवफा होऊन पळून जाते
चवथ्याच्या मुलीवर सामुदायिक बलात्कार होतो

हे पेपरांत येतंच राहिलं कित्येक वर्षं रोज
पण हा रस्ता रोज बदलतोय त्याचं काय ?
ओळखीची वस्ती सतत विखुरतेय तिचं काय ?
आपल्या मनांत त्याच त्या प्रतिमा येतात त्यांचं काय ?

डोळ्यांत जहरांची वाग
सर्वांनीं बेभान होऊन ठेचलेला
एकटक बघतो नाग

थोड्या वेळापूर्वीं ही फडा उभी होती
आत्मसंरक्षणार्थ, दंशाला तयार
आणि आतां गरळ सारं फुकट गेलंय

सपाट जमिनीवर लोळागोळा मी
बिळाबाहेर, काठ्यांच्या वर्षावांत,
माझ्या भूमिगत बांधवांपासून वेगळा

हे डोळे, मरणाच्या तीव्रतेचे मणी,
त्यांत उभीं उत्तुंग आमचीं अंगचीं जहरं
तुमचीं प्रतिबिंबं विरघळून टाकणारं जहालपाणी

माझ्या अखेरच्या फूत्कारांत वेदना नाहीं
त्वेष नाहीं, शत्रूची किंवा मित्राची ओळख नाहीं
माझ्या खांडोळ्यांत माझी सरपटती सही नाहीं

न्याय्येहो, इथं मारला जातो खुद्द शेष
हे अहिंसक निसर्गावरच उठलेत आता

वाण्याच्या दुकानावर सकाळीं
एकेक नाण्यांतून व्यक्त होतो
लाकडी पेट्रींत समाजाचा अर्थ

किलोच्या भावानं ग्राम खरेदी होतात
मी माझ्या खिडकींतून बघतों
झोपड्यांबाहेर वाढणारी वर्दळ

रात्रीं इथंच पोरीवरून भांडण होऊन
राडा झाला. पांच डोकीं फुटलीं.
एक कोथळा बाहेर आला. पोलिस आले.

खिडकी बंद करून मीं बिहाग ऐकला.
व्हिस्की प्यायलों. तर पुन्हां आरडाओरड.
खालच्या गुत्त्यांतला एकजण प्यालेला

रस्त्यावर येऊन सर्व जगाची माय झवत
आणि त्याला आवरणारे त्याच्या बहिणीवर.
जरा सामसूम झाल्यावर मी जास्त प्यायलों.

ह्यांच्यात जायची आपली ना इच्छा, ना हिंमत.
हयांच्यांतच हयांच्यापासून अलग आपण.
मात्र डास, माशा, उंदीर, झुरळं समाईकच.
वाणी, पानवाला, भाजीवाल्या, कोळणी समाईक.

रस्ता, स्टेशन, बस, पायवाटा समाईक.
सत्यनारायणाच्या महापूजेला दोन रुपये देऊन
यापुढें कविता न लिहितां रिसीट फाडावी हें उत्तम,

खिडकींत सबंध कुटुंब जमावं तशा
डोळ्यांत गोळा होतात सर्द जखमा
रस्त्यांतली मिरवणूक पहायला

लोकशाहीचा पुन्हां एकदा जय झालाय
जणूं काय पूर्वींपासून जय व्हायची
तिला सवयच आहे या देशांत

आपल्या तरुण बायकोला कुलुपांत ठेवून
तो रात्रपाळीला जातो आणि
सही करून पैसे घेईपर्यंत थकून जातो

गुत्त्यांतल्या बाकड्यावर जाड चष्मा
तशीं बाकं चमकतात नारिंगी रंगाचीं
आणि बशींत काळवंडलेल्या चण्यांची रास

मशीन बंद पडतांच सैरावैरा धांवावंसं वाटतं
मशीनवरच्या माणसाचे वैरी उभे असतात
गेटजवळ, गल्लीच्या वळणावर, कांब घेऊन

शहरांत कवटचा फुटतात, कोथळा बाहेर येतो
निष्पाप माणसानं रस्ता ओलांडायचा म्हटला तर—
काय हें ? लॉरीभर केळीं, प्रेत टायरखालीं !

आम्हांला कविता शिकवणाऱ्या मास्तरांनीं
आम्ही जिथें राहतों ती खोली पाहिलेली नाहीं

मास्तर कविता शिकवतात तेव्हां त्यांची
थोरली झवाडी मुलगी मॅटिनी शोंत असते

मास्तर वृत्त समजाऊन सांगतात तेव्हां
सेंट्रल रेल्वेच्या गाड्या चार तास लेट असतात

त्यांचा धाकटा मुलगा नाक्यावर उभा असतो
मास्तर चाळीस रुपये उसने घ्यायचा विचार करतात

दरम्यान केशवसुतांची प्रतिभा तारांगणांत जाते
बालकवि आनंदानं कुरणांत लोळून येतात

तांबे लाइन मारतात आणखी एका घरंदाज बाईवर
घट जिचा रिकामा नळावरी

फर्स्टक्लासमधून प्रवास करणारे मर्ढेकर
इंग्रजींतल्या इंग्रजींत पुटपुटत असतात

लालबाग नाक्यावर नारायण सुर्वे पिशवींत
वर्गयुद्धाचीं वांगीं भरून चिंचपोकळीकडे वळतात

नामदेव ढसाळ दगड गोळा करत आहेत
कविता शिकवून थकलेले मास्तर चहा पितांना

मास्तरांच्या चहांत असं काय अमृत आहे
कीं ज्यामुळें त्यांना कविता शिकवायला उत्साह येतो ?

ब्रुक बाँड कंपनीच्या मळ्यांतले सर्व बलात्कार
गाळले जाऊन त्यांचं अवीट सुख कपांत आलंय

त्यांतच साखर पडलेली आहे दक्षिण महाराष्ट्रांतल्या
अस्पृश्यांच्या हड्डीनं स्वच्छ दाणेदार बनलेली

शिकतंय-सवरतंय सबंध मुंबई शहर
कर्तव्याच्या गोणपाटांत ज्ञान भरून घेत

जगभरचे कवी फाउंटनच्या फुटपाथवर आलेत
गॉगल लावलेल्या टूरिस्टांचे घोळके फिरतायत

मास्तर नवाकाळ वाचतात, सकाळ वाचतात,
लोकसत्ता वाचतात, महाराष्ट्र टाइम्स सोडत नाहींत

मास्तरांना पाठ आहेत बोरकर अन कुसुमाग्रज
मास्तरांच्या बायकोचं आतां ऑपरेशन होणाराय

ओळखीच्या डॉक्टरची चिठ्ठी घेऊन ते गेलेत
टाटा हॉस्पिटलच्या खिडकींत नर्व्हस होऊन

गर्भाशयाच्या कॅन्सरवर कविताच नाहीं
एक तुकारामानं लिहिली असली तरच

मास्तर इंग्रजींत फॉर्म भरून सही करतात
शिकवणीचे पैसे अजून वसूल व्हायचेतच

## दहा

झाडभर चिवचिवणाऱ्या चिमण्या
वेदनेसारखं कांटेरी एकसंध चैतन्य
आपल्या खडकासारख्या भक्कम दुःखाला
फोडतंय बेवारशी कोमलपणाचं स्तन्य

आपण ज्या सकाळीं जागे झालोंत
तिचा देशकाळ निश्चित करण्यापूर्वींच
आपला वध केला जातोय ह्या ठिकाणीं

अलग अंगांनीं एकमेकांना कुरवाळून
ह्या दारुण बागेंतल्या वृक्षांच्या पडछायेंत
बहुरंगी समागमांत आपण बागडलों

अंगांतून घळाघळा घाम गेल्यानंतर
निरिच्छ आणि निद्रिस्त झालों आपण
— आणि आतां ह्या झाडभर चिवचिवणाऱ्या वेदना.

‘ प्रास ’च्या आणखी कविता ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2402
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

REFBK-0024146
REFBK-0024146

**Arun Kolatkar ☐ Jejuri ☐ 3rd edition**
**भालचंद्र नेमाडे ☐ मेलडी ☐ दुसरी आवृत्ति**
**वसंत दत्तात्रेय गुर्जर ☐ समुद्र**
**सतीश काळसेकर ☐ साक्षात्**
**वसंत दत्तात्रेय गुर्जर ☐ गांधी मला भेटला**
**अरुण कोलटकर ☐ अरुण कोलटकरच्या कविता ☐ दुसरी आवृत्ति**
**नामदेव ढसाळ ☐ खेळ**

# सेझार व्हाय्येहो

१८९२ साली पेरू देशांत जन्मलेला नि १९३८ साली मरून गेलेला अगदीं मोजक्या पण भलत्याच जबरदस्त कविता लिहिलेला स्पॅनिश कवि. लोर्का, नेरुदा वगैरेंचा मित्र. त्याच्या दहा (नि परिशिष्ट म्हणून एक) कवितांचा

# दिलीप पुरुषोत्तम चित्रे

यांनीं केलेला अनुवाद नि व्हाय्येहोला उद्देशून त्यांनी लिहिलेल्या दहा (खरं तर बारा) कविता मिळून हा कवितासंग्रह

# दहा बाय दहा

'सिसिफस आणि बेलाक्वा' नंतर मराठी वाचकाला साक्षर करण्याच्या 'प्रास'च्या धडपडींतला आणखी एक प्रयत्न.

अशी कवितांची एक माळकाच करतां आली तर—?

हें पहिलं फूल.

